# Current Global Reviewer

UGC Approved International Research Refereed Journal For All Subjects & All Languages

ISSN 2319-8648 | Impact Factor - 2.143 | Indexed (IIJIF | UGC Approved Sr. No. 64310


SPECIAL ISSUE

(20 Sept. 2017) Volume I, Issue-I

On the Occasion of ICSSR SPONSORED
One Day National Conference On

# ROLE OF PANCHAYAT RAJ IN RURAL DEVELOPMENT IN INDIA

Organized by

Department of Public - Administration, Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai, Dist. Beed (M.S.)




**Editor in Chief**
Mr. Arun Godam

**Guest Editors**

**Principal Dr. Arun Dalve**
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai, Dist. Beed (MS)

**Assit. Prof. S.D. Dixit**
Head Dept. of Public Administration
Vasundhara College, Ghatnandur

**Assit. Prof. H.W. Jadhav**
Dept. of Public Administration
Vasundhara College, Ghatnandur



www.rjournals.co.in



Scanned with CamScanner

Role of Panchayat Raj in Rural Development in India
CURRENT GLOBAL REVIEWER
www.rjournals.co.in
Vol I Issue I, 20 Sept. 2017
UGC Approved Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143


| Sr. No. | Article Title | Author | Page no. |
|---|---|---|---|
| 1 | Women Empowerment Through Panchayati Raj Institutions | Dr. B. R. Katturwar. | 1 |
| 2 | Drinking water quality in rural India: Issues and approaches | Mr. Shaikh Mohmmad Hanif Ismailsab | 3 |
| 3 | Impact Of Jalyukta-Shivar Abhiyan: A Study Of Manjara River In Latur District | Dr. Shinde Prakash Raosaheb | 7 |
| 4 | Role of Panchayat Raj in Poverty Eradication | Dr. Vandana M. Mahure | 11 |
| 5 | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गारंटी योजना-एक चिकित्सा | डॉ.पिंपळे बी.एस. , प्रा.दीक्षित एस.डी. | 15 |
| 6 | ई-पंचायतों से सशक्त होता पंचायतराज | प्रा.डॉ. बिरंगणे एस.एस. | 17 |
| 7 | ग्रामीण विकासाच्या संदर्भात ग्रामपंचायतीच्या कार्यक्षमतेचा अभ्यास- दिवाबत्तीच्या विशेष संदर्भात : मराठवाडा एक अध्ययन | प्रा.डॉ. गंगणे जीवन सुदामराव | 20 |
| 8 | पंचायतराज व्यवस्थेतील ग्रामसभेचे महत्व | प्रा.अमोल उत्तमराव गंगणे | 25 |
| 9 | महिला नेतृत्व व महिला सक्षमीकरण | प्रा.डॉ.आकोलकर आशा दगडू | 28 |
| 10 | पंचायतराज महिला आरक्षण आणि महिला सबलीकरण | प्राचार्य, डॉ. अरुण दळवे | 31 |
| 11 | ग्रामीण जीवन आणि जलयुक्त शिवार | प्रा.डॉ.सुधाकर भालेराव | 34 |
| 12 | पंचायतराज व ग्राम विकास | प्रा.बिडवे टी.एस | 37 |
| 13 | पंचायत राज आणि महिला सक्षमीकरण | डॉ.चव्हाण संजय संदिपान | 40 |
| 14 | ग्रामीण विकासामध्ये ग्रामसभेची भूमीका | डॉ. दिपक एस. वाघमारे | 41 |
| 15 | ग्रामीण विकास आणि पंचायतराज व्यवस्था | प्रा.डॉ. जे.एस. ढवळे | 45 |
| 16 | रोल ऑफ पंचायरत राज इन रुरल डेव्हलपमेंट इन इंडिया भारताच्या ग्रामीण विकासात पंचायत राजचे योगदान | डॉ. मंचक रंगनाथराव मोरे | 47 |
| 17 | पंचायतराज संस्था मधील महिला नेतृत्वाचा राजकीय अभ्यास | प्रा.डॉ.कदम एच.पी. प्रा.डहाळे सचिन | 50 |
| 18 | नेतृत्व विकासात पंचायतराजची भूमिका | डॉ. शंकर लेखणे | 53 |
| 19 | ग्रामीण नेतृत्व विकासात पंचायतराजची भूमिका | प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे) | 56 |
| 20 | ग्रामीण विकासात पंचायतराच्या कार्यक्षमतेची भूमिका | डॉ. कल्पना हनुमंतराव घारगे | 60 |
| 21 | स्वच्छ भारत अभियानात पंचायतराजची भुमिका | प्रा. जाधव हेमराज वामनराव | 63 |
| 22 | जलयुक्त शिवार आणि ग्रामीण विकास | डॉ.जिजाबाई कांगणे | 65 |
| 23 | भारतातील ग्रामीण विकासात प्रशासनाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास. | डॉ. जोगदंड संजय पांडूरंग | 69 |
| 24 | ग्रामीण विकासासाठी रोजगार हमी योजना | डॉ.व्यंकट विळेगावे , डॉ. नागनाथ कळबंडे | 71 |
| 25 | पंचायतराज व्यवस्था आणि ग्रामीण विकास : एक मुल्यमापन | सुनिता कांबळे, प्रा. संजय कांबळे | 74 |
| 26 | पंचायतराज व्यवस्थेचे अवलोकन | प्रा. डी.के. कटके | 78 |
| 27 | ग्रामीण स्वच्छता- आव्हाने आणि पुढील वाटचाल | डॉ.डी.के.खोकले | 80 |
| 28 | महिला सक्षमीकरणात पंचायतराजची भूमिका | डॉ.संतोष कुऱ्हे सहा.प्रा.आरडले एस.डी. | 83 |
| 29 | पंचायत राज व्यवस्था महिलांचा राजकीय सहभाग | डॉ. देशमुख विठ्ठल शंकरराव | 85 |
| 30 | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना विशेष संदर्भ | प्रा. डॉ. आमले एस. एस. | 87 |


Scanned with CamScanner

(53) CURRENT GLOBAL REVIEWER
www.rjournals.co.in | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Vol I Issue I, 20 Sept. 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# (18)
# नेतृत्व विकासात पंचायतराजची भूमिका

**डॉ. शंकर लेखणे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालय,
शंकरनगर.

---

**प्रस्तावना -** लोकशाही विकेंद्रीकरणाचे एक महत्वपूर्ण पाऊल म्हणून पंचायतराजची निर्मिती अत्यंत महत्वाची मानली जाते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंचायतराज व्यवस्थेची निर्मिती प्रामुख्याने ग्रामीण भागातील प्रश्नांची प्रभावीपणे सोडवणूक करण्यासाठी एक प्रशासकीय संस्था या स्वरुपात झालेली असली तरी पंचायतराजचे महत्व वेगवेगळया कारणाने अधोरेखित होते. लोकशाही मूल्यांबाबत अजाण असलेल्या भारतीयांना स्वातंत्र्यानंतर लोकशाही मूल्यांची ओळख करुन देणारी एक पाठशाळा म्हणूनही पंचायतराजकडे पाहिले जाते. ग्रामीण विकासाला गतीमान करुन ग्रामीण जनतेचा सर्वांगीण विकास घडवून आणणारी एक प्रशासकीय व्यवस्था म्हणूनही पंचायतराकडे पाहिले जाते. परंतु पंचायतराज व्यवस्थेचे महत्व ग्रामीण भागात नवीन नेतृत्व निर्माण करण्याच्या भूमिकेमुळे अधिकच अधोरेखित होते. पंचायतराज व्यवस्थेमुळे ग्रामीण भागातील स्त्री-पुरुष व विविध स्तरातील व्यक्तींना नेतृत्व करण्याची संधी मिळालेली आहे.

- **७३ वी घटना दुरुस्ती आणि नेतृत्व विकास :-**

ग्रामीण भागातील नेतृत्वाचा व्यापक विकास ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर झालेला दिसून येतो. तोपर्यंत ठराविक लोकांच्या नियंत्रणाखाली पंचायतराज व्यवस्थेचा कारभार चालत असे परंतु ७३ व्या घटना दुरुस्ती नुसार महिलांना ३३ टक्के अनुसूचित जाती व जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात आणि नागरिकांच्या मागासवर्गास २७ टक्के आरक्षण निश्चित करण्यात आले परिणामी वेगवेगळया जातीतील व स्तरातील नेतृत्व उदयास आले. नेतृत्व विकासाचा हा अत्यंत महत्वपूर्ण टप्पा मानला जातो. पंचायतराज व्यवस्थेमध्ये या घटना दुरुस्तीमुळे सर्वसामान्य जनतेतून नेतृत्व पुढे येणे शक्य झाले. आता महिलेचे आरक्षण ३३ टक्के वरुन ५० टक्के करण्यात आल्यामुळे महिलांच्या सबलीकरणास गती मिळण्यास निश्चितच मदत होईल. एकंदरित ७३ व्या घटना दुरुस्तीने ग्रामीण नेतृत्वाचा विकास होत असल्याचे दिसून येते.

पंचायतराज संस्थांची मागील २० वर्षाच्या वाटचाली संदर्भातील एक निरिक्षण महत्वपूर्ण वाटते. १९९४ ते २०१४ या वीस वर्षात पंचायतराज व्यवस्थेने सर्व क्षेत्रात केलेला बदल १९६२ ते १९९४ या ३२ वर्षापेक्षा प्रभावी आहे. या काळात अ. जा., अ.ज., ओ.बी.सी., तसेच महिला या कमकुवत समजल्या जाणाऱ्या घटकातून नेतृत्व निर्माण झाले. ग्रामसभेमुळे वास्तविक गरजवंताची यादी निर्माण झाली. लोकशाहीस पुरक निवडणूक प्रक्रिया सुरु झाली.

- **पंचायतराज व्यवस्थेतील नेतृत्व उदयाचा परिणाम :-**

पंचायतराज व्यवस्थेमुळे जनसामान्यातून व्यापक प्रमाणात नेतृत्वाचा उदय झाला आहे. महिलांच्या नेतृत्वा संदर्भात तर आपण उल्लेखनीय प्रगती केली आहे. जो ग्रामीण भागातील महिलांचा पंचायतराज मधील जागामध्ये ५० % वाटा आहे. जो भारतीय संसदेच्या महिला प्रतिनिधीत्वापेक्षा निश्चितच जास्त आहे. ' जागतिक स्तरावर महिलांचे संसदेतील प्रमाण २२.४ % आहे. तर भारतात केवळ १२.२ % महिलांचे प्रतिनिधित्व आहे. १४१ देशांच्या क्रमावारीत आपला क्रमांक १०३ आहे'. यावरून आपणास दिसून येते की, संसदेतील प्रतिनिधीत्वापेक्षा पंचायतराज व्यवस्थेतील महिलांचे नेतृत्व त्यांच्या सबलकरणाचे द्योतक आहे. एकंदरित नेतृत्व निर्माणाच्या अनुषंगाने पंचायतराजने सर्वसमावेशकता साधली आहे.

- पंचायतराज व्यवस्थेमुळे ग्रामीण राजकारण व प्रशासनात महिलांना सहभागी होण्याची संधी मिळाली आहे.
- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागास वर्गास नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे.
- महिला व मागास जातीतील लोकांना ग्रामीण विकासाच्या संदर्भात निर्णय प्रक्रियेत भाग घेऊन त्यांना कार्यान्वित करण्याची संधी मिळाली आहे.
- पंचायतराज व्यवस्थेमुळे लोकशाही मुल्याबाबत सर्वसामान्यांमध्ये जागृती येण्यास निश्चितच मदत झाली आहे.

Scanned with CamScanner

www.rjournals.co.in | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Vol I Issue I, 20 Sept. 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

- महिलांमध्ये व मागासवर्गिय जनतेमध्ये आत्मसन्मान, आत्मविश्वास वाढत असून त्यांच्या सामाजिक, राजकीय प्रगतीसाठी पोषक वातावरणाची निर्मिती झाली आहे.
- परिस्थितीचे आकलन लोकांना समजून घेण्याची क्षमता, आपले विचार पटवून देण्याची क्षमता, निर्णय घेण्याची क्षमता, लोकांमध्ये विश्वासाची भावना तयार करणे अशा नेतृत्व गुणांचा सर्व सामान्यामध्ये विकास होण्यास मदत होत आहे.

**पंचायतराज व्यवस्थेतील नेतृत्वापुढील अडथळे :-**

पंचायतराज व्यवस्थेमुळे नवीन नेतृत्व निर्माण होण्यास निश्चितच मदत झाली आहे. परंतु या नेतृत्वाचा विकास होण्यासाठी आणि त्यांची प्रभावशीलता व कार्यक्षमता वाढण्यासाठी काही अडथळे असल्याचे दिसुन येते. काही अडथळे पुढील प्रमाणे आहेत.

- ग्रामीण भागातील दारिद्रयाचे कमालीचे प्रमाण हा या नेतृत्वापुढील एक महत्वाचा अडथळा आहे. 'महाराष्ट्रासारख्या प्रगत समजल्या जाणाऱ्या राज्यात ग्रामीण भागातील एकुण जनतेपैकी २४.२ टक्के लोक दारिद्रय रेषेखाली जीवन जगतात' त्यामुळे बहुतांश लोक अजुनही मुलभूत गरजांची तोंडमिळवणी करण्याच्या प्रयत्नातच व्यस्त असतात अशा प्रतिकूल आर्थिक विवंचनेत असलेल्या लोकांना प्रभाविपणे नेतृत्व करताना अडचणींना सामोरे जावे लागते.
- ग्रामीण भागात सामान्य जनतेमध्ये मोठया प्रमाणात असलेली निरक्षरता, राजकीय कार्याबाबतचे अज्ञान यामूळे अनेक ठिकाणी गावातीत एखादया श्रीमंत व प्रस्थापित माणसाच्या नियंत्रणाखाली कामकाज चालते त्यामुळे नवीन नेतृत्वास स्वविवेकाने कार्य करण्यास बाधा येते.
- ग्रामिण भागात लोकांची निवडणूकीच्या वेळी गटातटात विभागणी होऊन अनेकवेळा भांडणे, तंटे होतात परिणामी विकासकामाच्या वेळी एकत्र येऊन कार्य करण्याऐवजी विरोधासाठी विरोध अशी भुमिका घेतली जाते परिणामी विकास कामात अडथळे निर्माण होतात.
- अनेक ठिकाणी महिलांना पदाधिकारी म्हणून काम करताना पुरुषी अहंकार व पुरुष प्रधान समाजव्यवस्था अडथळा निर्माण करते. पदाधिकारी महिलेला स्वविवेकाने कार्य करु न देता तिचा पती किंवा मुलगा किंवा घरातील कर्ता पुरुषच तिची कामे करत असतो असे बऱ्याच ठिकाणचे चित्र आहे. त्यामुळे महिलेच्या नेतृत्वापुढे हा एक अडथळा असल्याचे दिसुन येते.
- मागासवर्गीय नेतृत्वाबाबतही अनेक अडचणी दिसून येतात अनेक ठिकाणी गावातील प्रतिष्ठित व प्रभावी असलेल्या राजकीय व्यक्तीच्या मर्जीनुसार कार्य करावे लागते. त्याच बरोबर जातीयता संपुर्णपणे नाहीशी न झाल्यामुळे अनेकजण मागासवर्गीय नेतृत्वाला स्वीकृत करत नाहीत किंवा त्यांच्या विकास विषयक कल्पना, योजना राबवितांना सक्रीयपणे पाठींबा देत नाहीत त्यामुळे अनेक अडचर्णीना तोंड द्यावे लागते.
- पंचायतराज व्यवस्थेमध्ये नव्याने उदयास आलेल्या नेतृत्वास कोणत्याही प्रशिक्षणाची तरतूद नसते. पंचायतराज संबंधी कायदे, कार्यपध्दती, विविध योजना, कार्यक्रम व त्यांची अंमलबजावणी या संदर्भात कोणतेही प्रशिक्षण वर्ग घेतले जात नाहीत त्यामुळे त्यांना आपत्ती कार्ये प्रभावीपणे करता येत नाहीत.

- **निष्कर्ष व उपाययोजना :-**

पंचायतराज व्यवस्थेमुळे लोकशाही बळकटीकरणाच्या दृष्टीने नवनवीन नेतृत्वास संधी मिळत आहे. महिलांच्या व मागासवर्गाच्या नेतृत्वामुळे न्यायपूर्ण व्यवस्था निर्मितीचा मार्ग हळूहळू प्रशस्त होत चालला आहे. परंतु या मार्गावर निश्चितच काही अडथळेही आहेत. ते अडथळे दूर करण्यासाठी व्यापक प्रयत्नांची गरज असल्याचे दिसून येते. शासनाने ग्रामीण भागातील गरीबी निर्मुलनाचा कार्यक्रम अत्यंत प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे त्यासाठी शेती, कुटीर उद्योग, ग्रामीण भागातील उद्योग यांना गतीमान करण्यासाठी आणि रोजगार वृध्दीसाठी अजूनही मोठया प्रमाणात काम करणे गरजेचे आहे. प्रामुख्याने शेती विषयक व रोजगार विषयक समस्यांचा सातत्याने विचार करुन त्यांना बळकटी आणली पाहिजे. दारिद्रय व गरीबी नाहीशी करण्याचा उपाय करणे आवश्यक आहे. समाजाची पुरुषी मानसिकता आणि जातीयतेची मानसिकता कमी करण्यासाठी जनजागृतीची आवश्यकता आहे, नवनविन नेतृत्वास सक्षम करण्यासाठी प्रशिक्षणाची तरतुद करावी व त्यांच्या मानधनात मोठी वाढ करावी.

Scanned with CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER
www.rjournals.co.in | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Vol I Issue I, 20 Sept. 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

ज्यामुळे त्यांना आपली कामे प्रभावीपणे व पूर्णवेळ देऊन करता येतील. 'सेल्झनिकने नेतृत्वाची प्रामुख्याने चार कार्ये सांगीतली आहे. १. संस्थेचे जीवित कार्य व भूमिका यांची व्याख्या करणे २. संस्थेच्या हेतूंना मुर्तरुप देणे. ३. संस्थात्मक सचोटीचा बचाव करणे. ४. अंतर्गत कलह सोडविणे.' या चारही कार्यांची पुर्तता करता यावी असे नेतृत्व तयार व्हावे यासाठी शासकीय पातळीवरुन शिक्षण, प्रशिक्षण, आर्थिक पाठबळ, आवश्यक तांत्रिक, प्रशासकीय सहाय्य यांची उपलब्धता वाढवण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे केल्यास निश्चित पंचायतराज व्यवस्थेतील नेतृत्व अधिक सक्षम व प्रभावी होऊ शकते.

संदर्भ -

१) मोहित भट्टाचार्य, न्यु होरायझन्स ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, (अनुवाद-वासंती फडके) के सागर पब्लिकेशन्स्, २०११
२) लोकसहभागातून ग्रामपंचायत सुक्ष्म नियोजन प्रक्रियेकरिता संदर्भ साहित्य, ग्रामभारती, यशदा पुणे, २०१४
३) डॉ. गोविंद यमलवाड, स्थानिक स्वराज्य संस्था, कल्पना प्रकाशन, नांदेड.
४) Bhanpriya Rao, Womens in Parliament, Where does India figure among the rest of the world, https:/factly.in
५) Dr. Shrebhangi Dinesh Rathi, Women Leadership in Panchayat Raj, Shubhangi rathi. Blogspot.in, २ April २०१
६) Indian express.com
७) डॉ. बी. आर. कत्तुरवार, ग्रामीण विकास प्रशासन, ओमसाई प्रकाशन, देगलुर २०१७

Scanned with CamScanner